# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# महापालिकेविरोधात अवमान याचिका

## माहिती देण्यास विलंब केल्याचा ठपका ठेवत याचिका दाखल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** जागेच्या खासगी वाटाघाटीसंदर्भात आठ आठवड्यांत योग्य तो निर्णय घेऊन माहिती देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याने याचिकाकर्त्याने अवमान याचिका दाखल केली. त्यामुळे माहिती देण्यास जाणीवपूर्वक विलंब केल्याचा ठपका ठेवत एक कनिष्ठ, एक उपअभियंत्याला निलंबित केले आहे.




पिंपरी- चिंचवड महापालिकेत नीलेश दाते हे स्थापत्य विभागात कनिष्ठ, तर राजकुमार सूर्यवंशी हे उपअभियंता म्हणून कार्यरत आहेत. महापालिकेने कासारवाडी येथे खासगी वाटाघाटींद्वारे जागा घेतली होती. मात्र, या वाटाघाटीच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सुनावणीमध्ये न्यायालयाने भूसंपादनाबाबत आठ आठवड्यांत योग्य तो निर्णय घेऊन त्या निर्णयाची याचिकाकर्त्यांना माहिती द्यावी, असा आदेश महापालिकेला दिला होता. न्यायालयाच्या या निर्णयानंतर मुदतीत प्रस्ताव ठेवून कार्यवाही करण्याची जबाबदारी दाते आणि सूर्यवंशी यांची होती. मात्र, त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी न्यायालयात अवमान याचिका दाखल केली. त्यानंतर पालिकेने दाते आणि सूर्यवंशी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागितला. त्यांचा खुलासा समाधानकारक नव्हता. या दोघांनी वेळीच कार्यवाही केली असती, तर महापालिकेच्या विरोधात अवमान याचिका दाखल झाली नसती.

कर्तव्यात कसूर केल्याबद्दल दाते व सूर्यवंशी यांचे सेवानिलंबन करून खातेनिहाय चौकशी सुरू करण्याचा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिला. महापालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात संकेत जंगम हे लिपिक पदावर कार्यरत होते. त्यांच्याकडे नाट्यगृहाच्या कार्यक्रमाची अनामत रक्कम, भाडे यासह इतर शुल्क वसूल करणे, पावत्या देणे, दैनंदिन भरणा लेखा शाखेकडे जमा करणे, दप्तर अद्ययावत ठेवणे असे कामकाज दिले होते. मात्र, ११९ कार्यक्रमांचे चार लाखांचे भाडे त्यांनी कोषागारात भरले नाही. या पैशांचा अपहार केला आहे. लेखापरीक्षणात मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्याचे दिसून आले. सात लाख ६६ हजार रुपयांची रक्कम वसूलपात्र आहे. धनादेश कोषागारात भरले नाहीत. त्यामुळे जंगम यांचे निलंबन करत खातेनिहाय चौकशी सुरू केली आहे.

### वाटाघाटीच्या निर्णयाविरोधात याचिका

» पिंपरी-चिंचवड महापालिकेत नीलेश दाते हे स्थापत्य विभागात कनिष्ठ, तर राजकुमार सूर्यवंशी हे उपअभियंता म्हणून कार्यरत आहेत. महापालिकेने कासारवाडी येथे खासगी वाटाघाटींद्वारे जागा घेतली होती. मात्र, या वाटाघाटीच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सुनावणीमध्ये न्यायालयाने भूसंपादनाबाबत आठ आठवड्यांत योग्य तो निर्णय घेऊन त्या निर्णयाची याचिकाकर्त्यांना माहिती द्यावी, असा आदेश महापालिकेला दिला होता.

# पै.बाळासाहेब रामचंद्र लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी पिंपरी चिंचवड शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पै. बाळासाहेब रामचंद्र लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आणि महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवड शहर निवड चाचणी स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी स्पर्धा (माती आणि गादी विभाग) सोमवार दि.१३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता भोसरी येथील पै. मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल येथे संपन्न होणार आहे. या स्पर्धे चे आयोजक महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद हे असून संयोजक पै. नितिन बाळासाहेब लांडगे, महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन भवानी तालीम यांच्यावतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेबद्दल माहिती देताना संयोजक पै. नितीन बाळासाहेब लांडगे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर




परिषदेच्या मान्यतेने धाराशिव येथे होत असलेली ६५ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा अस्थायी समिती निरीक्षक महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद निरिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड चाचणी निवड कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र केसरी २०२३-२४ साठी पिंपरी चिंचवड शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहेत. पै. बाळासाहेब रामचंद्र लांडगे यांच्या ६९ वा वाढदिवसानिमित्ताने पिंपरी चिंचवड शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धा २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार (दि.१३) रोजी (वजन गट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७, ८६ ते १२५ महाराष्ट्र केसरी) माती आणि गादी विभाग मध्ये या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. भोसरी येथील पै. मारुती रावजी लांडगे अंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलन येथे या स्पर्धा होणार आहेत. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद या स्पर्धेचे आयोजक असून संयोजक पै. नितिन बाळासाहेब लांडगे, महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन भवानी तालीम हे असणार आहेत.

# प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाईचा दंडुका!

## तीन दिवसांत ३० लाख दंड वसूल

पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी। वायुप्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारे बांधकाम व्यावसायिक, कचरा जाळणारे, हवेचे प्रदूषण करणाऱ्यां विरोधात महापालिकेने कारवाईचा दंडुका उगारला आहे. तीन दिवसांत ३० लाखांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वायुप्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने ३२ प्रभागांमध्ये १६ वायुप्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. या पथकांद्वारे प्रभागातील बांधकाम स्थळांना भेट देऊन छायाचित्रे, चित्रफितीद्वारे त्यांची नोंद घेण्यात येत आहे. या दरम्यान प्रदूषण नियंत्रण तरतुदींचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. नोटीस देऊन कामाची जागा लाखबंद (सील) केली जात आहे. थेरगावातील केजूदेवी बंधारा येथे पवना नदीमधील पाण्यावर तवंग उमटत असल्याने दुर्गंधी येत होती. त्यामुळे पर्यावरण व जलनि:सारण विभागाने ताथवडे भागात सर्वेक्षण सुरू केले होते. ताथवडेतील कपडे धुणाऱ्या (ड्रायक्लीनर) कंपनीने रसायनयुक्त पाणी विनाप्रक्रिया पवना नदीपात्रात सोडले. हे पाणी काळपट, निळसर, फेसयुक्त होते. नदीचे पाणी दूषित करून जलचर, तसेच मानवी जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी कंपनीचे मालक अभिषेक टंकारिया यांच्याविरोधात वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ‘स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी’ अभियान राबविण्यात येत आहे. प्लॅस्टिकचा वापर, प्रदूषण टाळणे, पर्यावरणपूरक स्थानिक उत्पादनांचा वापर करून दिवाळी साजरी करावी. फुलांच्या रांगोळीचा वापर, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार कराव्यात. त्याबाबतची ३० सेकंदांची चित्रफीत, रील डुरलहहूळुरश्रळ या हॅशटॅगचा वापर करून समाजमाध्यमावर टाकावा. आणि लिलळपवळरसेींळप या एक्स व इन्स्टाग्राम हँडलला टॅग करणे अनिवार्य आहे. २२ हजार रुपयांची ३० बक्षिसे विजेत्यांना दिली जाणार आहेत.




> “वायुप्रदूषण नियंत्रण पथकाकडून विविध जागांची पाहणी करण्यात येत आहे. वायुप्रदूषण रोखण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे. **–संजय कुलकर्णी,** सह शहर अभियंता, पर्यावरण विभाग, महापालिका

# वायू प्रदूषण करणाऱ्यांकडून ३० लाखांचा दंड वसूल!

## मोशी रुग्णालयाच्या वाढीव

पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी। शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने प्रदूषण नियंत्रण पथक नियुक्त केले आहेत. त्यांनी मार्गदर्शक सूचनांचे पालन न करणाऱ्यांकडून आतापर्यंत ३० लाख २४ हजार ६६८ रुपये दंड वसूल केला आहे.

शहरात वायू प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. ३२ प्रभागांमध्ये १६ वायू प्रदूषण नियंत्रण पथकांची नेमणूक केली आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी न केल्याप्रकरणी पर्यावरण संरक्षण कायदा १९८६, वायू (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९८१ नुसार नोटीस बजावली. बांधकाम स्थळांना भेटी देऊन, छायाचित्र किंवा व्हिडिओग्राफीद्वारे नोंद घेतली जात आहे. मार्गदर्शक सूचनांचे पालन न करणाऱ्यांकडून आतापर्यंत ३० लाख २४ हजार ६६८ रुपये दंड वसूल केला आहे. प्रदूषण नियंत्रण सूचनांचे पालन न केल्याचे उघड झाल्यास दंड आकारला जात आहे. संबंधित जागा सील करून नोटीस बजाविलेल्यांची संख्या, वसूल केलेला दंड आणि दररोज होणाऱ्या कारवाईची नोंद पथकांद्वारे नोंद घेतली जात आहे.




> “‘शहरातील वायू प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने महापालिका प्रयत्नशील आहे. त्यामध्ये नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा आहे. वायू प्रदूषण नियंत्रण पथकांतर्फे शहरातील विविध जागांची पाहणी केली जात आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे. नागरिकांनीही त्यासाठी सहकार्य करून प्रदूषण रोखण्यासाठी हातभार लावावा. **– शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, महापालिका

# पवना नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी आंदोलन

पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी। मागील काही दिवसांपासून इंद्रायणी नदी व पवना नदी सतत फेसाळत आहे. दूषित पाणी नदीत सोडले जात असल्याने ही घटना वारंवार घडत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांना वारंवार तक्रार करूनदेखील प्रशासन याबाबत कोणतीही ठोस पावले उचलत नाही. यामुळे त्यांचा निषेध नोंदविण्यासाठी पिंपरी चिंचवडमधील पर्यावरण प्रेमी नागरिकांनी एकत्र येत निदर्शने केली.

पिंपरी चिंचवड शहरासह अनेक गावांची जीवनवाहिनी असलेल्या पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांची वाटचाल मृत अवस्थेकडे होत आहे. प्रदूषणामुळे नद्यांमधील परिसंस्थांची साखळी नष्ट होऊन, जैवविविधता धोक्यात येत आहे. या नदी प्रदूषणाकडे राज्य शासन, जिल्हा प्रशासन, महापालिका प्रशासनाने वेळीच लक्ष्य दिले नाही तर मोठा दुष्परिणाम पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यावर पर्यायाने मानवी जीवनावर होणार आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे आणि जबाबदार घटकांचे लक्ष्य वेधण्यासाठी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात निदर्शने करण्यात आली. यावेळी पर्यावरण प्रेमी संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ‘महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रार देखील करण्यात आली आहे. तथापि, महापालिका प्रशासन वेळकाढू पद्धतीने काम करत असून, पर्यावरण विभागातील मोठे अधिकारी यांचे संबंधित कंपन्यांशी लागेबांधे असल्याने हितसंबंध जपण्याचे काम पर्यावरण विभागाकडून करण्यात येत आहे.

# १९ कोटींची शिष्यवृत्ती वितरित!

## पाचवी-आठवीतील ३२ हजार ६६७ विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील पाचवी-आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतील ३२ हजार ६६७ शिष्यवृत्तीधारकांना शिष्यवृत्तीची रक्कम नवीन दराने वितरित करण्यात आली. यंदा शिष्यवृत्तीसाठी ४९ कोटी ९४ लाख ५० हजार रुपये आवश्यक असून, राज्य शासनाकडून मिळालेल्या १९ कोटी रुपयांचा निधी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आला. राज्यात पाचवीसाठी १६ हजार ६८३, तर आठवीसाठी १६ हजार २५८ विद्यार्थी संचसंख्या आहे. पाचवीच्या परीक्षेतून शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या आणि पुढे सहावी ते आठवी शिक्षण घेणाऱ्या एकूण ५० हजार ४९ विद्यार्थ्यांना, तर आठवीच्या परीक्षेत शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या ३२,५१६ विद्यार्थ्यांना नववी आणि दहावीला शिष्यवृत्ती दिली जाते. गेल्यावर्षीपर्यंत पाचवीला कमाल एक हजार रुपये, आठवीला दीड हजार



रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत होती. मात्र, यंदापासून शिष्यवृत्तीची रक्कम वाढवून पाचवीला पाच हजार रुपये, आठवीला ७ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे यंदापासून वाढीव दराने शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येत आहे. २०२३-२४ मध्ये एकूण ४० कोटी ४० लाख फक्त रुपये शिष्यवृत्तीसाठी मंजूर आहेत. तर २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणासाठी रक्कम ४९ कोटी ९४ लाख ५० हजार रुपये आवश्यक आहेत. त्यापैकी नुकताच शासनस्तरावरुन १९ कोटी ३९ लाख १९ हजार रुपये निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे सातवी, आठवी आणि दहावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यावर वाढीव दराने शिष्यवृत्ती पहिल्यांदाच वितरित करण्यात येत असल्याचे योजना विभागाचे उपसंचालक राजेश क्षीरसागर यांनी सांगितले. परीक्षेतून गुणवत्तेच्या आधारे शिष्यवृत्तीधारक ठरल्यानंतर योजना शिक्षण संचालनालयाकडून शिष्यवृत्तीचे वितरण विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर केले जात आहे. मात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती प्राप्त होत नसल्याने शिष्यवृत्ती वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. २०२१ पर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम न मिळालेल्या शिष्यवृत्तीधारक

> **“उर्वरित विद्यार्थ्यांना नवीन दराने शिष्यवृत्ती वितरित करण्यासाठी आवश्यक निधीची राज्य शासनाकडे मागणी केली आहे. निधी प्राप्त होताच उर्वरित सर्व विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती वितरण करण्यात येईल.**
>
> **– डॉ. महेश पालकर, संचालक, योजना संचालनालय**

विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती तालुकास्तरावर गट शिक्षणाधिकारी यांचेकडे द्यावी, ही माहिती गटशिक्षणाधिकारी यांचेकडून अद्ययावत झाल्यावर संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्ती जमा करण्यात येईल. तर २०२१ नंतरच्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याची अचूक माहिती संबंधित शाळेने परीक्षा परिषदेच्या या संकेतस्थळावर शाळा लॉगीनद्वारे अचूकपणे भरणे आवश्यक आहे. त्यासाठी शिष्यवृत्तीधारकांनी शाळेच्या मुख्याध्यापकाकडे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, यंदापासून शिष्यवृत्तीची रक्कम वाढवून पाचवीला पाच हजार रुपये, आठवीला ७ हजार ५०० रुपये शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे यंदापासून वाढीव दराने शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येत आहे. २०२३-२४ मध्ये एकूण ४० कोटी ४० लाख फक्त रुपये शिष्यवृत्तीसाठी मंजूर आहेत. तर २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणासाठी रक्कम ४९ कोटी ९४ लाख ५० हजार रुपये आवश्यक आहेत. त्यापैकी नुकताच शासनस्तरावरुन १९ कोटी ३९ लाख १९ हजार रुपये निधी प्राप्त झाला आहे.

# जेजुरीत उद्या सोमवती अमावास्या यात्रा!

## भेसळयुक्त भंडारा विकणाऱ्यांवर होणार कारवाई

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा देवाची सोमवती यात्रा सोमवारी (१३ नोव्हेंबर) भरणार असून, खंडोबा गडातून देवाचा पालखी सोहळा सकाळी सात वाजता प्रस्थान ठेवणार आहे. दुपारी साडेबारा वाजता पवित्र कऱ्हा नदीवर श्री खंडोबा म्हाळसादेवीच्या मूर्तींना धार्मिक वातावरणात स्नान घालण्यात येणार आहे. सोमवती अमावास्येच्या नियोजनासाठी होळकरांच्या छत्री मंदिर परिसरात खांदेकरी, मानकरी, ग्रामस्थ मंडळाची बैठक झाली. मुख्य इनामदार राजेंद्र पेशवे यांनी देवाची स्वारी सकाळी सात वाजता निघणार असल्याचे या वेळी जाहीर केले. रविवारी (१२ नोव्हेंबर) दुपारी तीन वाजता अमावास्या सुरू होत असून, सोमवारी दुपारी अडीचपर्यंत अमावास्येचा कालावधी आहे. त्यामुळे जेजुरीत सोमवती यात्रेला मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. पुरंदरचे तहसीलदार विक्रम रजपूत, देवस्थानचे मुख्य विश्वस्त पोपटराव खोमणे, विश्वस्त मंगेश घोणे, ॲड. पांडुरंग थोरवे, अभिजित देवकाते, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, संतोष खोमणे,



छबन कुदळे, अशोक खोमणे, कृष्णा कुदळे, सुधीर गोडसे, अजिंक्य देशमुख, व्यवस्थापक राजेंद्र जगताप बैठकीस उपस्थित होते. पालखी सोहळ्यातील भाविकांना चहा, पाणी आणि नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली असून, पालखी मार्गाच्या पायऱ्यांवरील अतिक्रमण काढण्यात येणार आहे, असे पोपटराव खोमणे यांनी सांगितले.मागील सोमवती यात्रेत खंडोबा गडावर पालखी उतरताना अपघात होऊन सहा जण जखमी झाले होते. त्यामुळे चेंगराचेंगरी होऊ नये यासाठी विशेष काळजी घेण्यात येत आहे. पालखीला खांदा

### भंडारा विकणाऱ्यांवर कारवाई

**» सोमवती यात्रेच्या निमित्ताने जेजुरीत मोठ्या प्रमाणात भंडारा-खोबऱ्याची विक्री होते. भंडाऱ्याला मागणी भरपूर असल्याने काही बाहेरील व्यापारी यात्रेत भेसळयुक्त भंडारा विक्रीसाठी आणतात. हा भंडारा बनावट असून, त्यामध्ये विविध रसायनांचा वापर केला जातो. पालखी सोहळा सुरू झाल्यावर शेकडो पोती भंडाऱ्याची उधळण केली जाते. या भेसळयुक्त भंडाऱ्यावर बंदी घालण्याची मागणी ग्रामस्थ मंडळाने केली होती. या भंडाऱ्याचा भाविकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याने कोणीही बनावट भंडारा विकू नये. विक्री केल्यास कडक कारवाई केली जाईल, अशा नोटिसा भंडार-खोबरे विक्रेत्यांना देण्यात आल्याची माहिती जेजुरीचे पोलीस निरीक्षक बापूसाहेब सांडभोर यांनी दिली.**

देणाऱ्या खांदेकऱ्यांना वेगळा पोषाख देण्यात आला आहे. १३०० खांदेकऱ्यांना अशा पद्धतीचे टी-शर्ट दिले.

# दिवसभर फटाक्यांची आतषबाजी!

## लक्ष्मी पूजनानंतर मोठ्या प्रमाणात उडवण्यात आले फटाके



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता खराब होत असल्याबाबत मुंबईत दिवाळीत फटाके उडवण्यावर न्यायालयाने निर्बंध घातले आहेत. गेल्या काही दिवसांत पुण्यातही हवेची गुणवत्ता बिघडल्याचे निदर्शनास आले आहे. असे असतानाही, रविवारी पहाटेपासून सुरू झालेली फटाक्यांची आतषबाजी दिवसभर सुरूच होती. सायंकाळी लक्ष्मीपूजनानंतर तर मोठ्या प्रमाणात फटाके उडवण्यात आल्याचे दिसून आले. पावसाळा संपून थंडीची चाहूल लागताच हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पावसामुळे जमिनीवर राहणारे धुलिकण हवेत जाऊन हवा प्रदूषित होते. वाहनांचा धूर, बांधकामे, फटाके यामुळे त्यात भर पडते. गेल्या काही दिवसांत मुंबईप्रमाणेच पुण्यातील हवेची गुणवत्ता बिघडल्याचे हवा गुणवत्ता निर्देशांकातील आकडेवारीतून दिसून आले होते. त्यामुळे आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांकडून करण्यात आले. त्याशिवाय वायू प्रदूषण रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड आणि पुणे महापालिकेकडून मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध करण्यात आल्या. दिवाळीचा सण ९ नोव्हेंबरपासून सुरू झाल्यावर फटाके उडवण्यास सुरुवात झाली. रविवारी नरक चतुर्दशी असल्याने पहाटेपासूनच फटाके उडवण्यास सुरुवात झाली. दिवसभर शहरात ठिकठिकाणी फटाके उडवणे सुरूच होते. तर सायंकाळी लक्ष्मी पूजनानंतर मोठ्या प्रमाणात फटाके उडवण्यात आले. त्यात बॉम्ब, माळांसारख्या आवाजी फटाक्यांसह आकाशात फुटणाऱ्या

### हवेची गुणवत्ता राखण्याचे दुर्लक्ष

» दिवाळीचा सण ९ नोव्हेंबरपासून सुरु झाल्यावर फटाके उडवण्यास सुरुवात झाली. रविवारी नरक चतुर्दशी असल्याने पहाटेपासूनच फटाके उडवण्यास सुरुवात झाली. दिवसभर शहरात ठिकठिकाणी फटाके उडवणे सुरूच होते. तर सायंकाळी लक्ष्मी पूजनानंतर मोठ्या प्रमाणात फटाके उडवण्यात आले. त्यात बॉम्ब, माळांसारख्या आवाजी फटाक्यांसह आकाशात फुटणाऱ्या रोषणाईच्या फटाक्यांचाही समावेश होता. त्यामुळे प्रदूषण कमी करणे, हवेची गुणवत्ता राखण्याचे दुर्लक्षच झाल्याचे दिसून आले.

रोषणाईच्या फटाक्यांचाही समावेश होता. त्यामुळे प्रदूषण कमी करणे, हवेची गुणवत्ता राखण्याचे दुर्लक्षच झाल्याचे दिसून आले. पुणे शहर आणि परिसरातील काही भागांमध्ये रविवारी हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर गेल्याचे दिसून आले. त्यात प्रामुख्याने पिंपरी चिंचवड, भोसरी, आळंदी, कात्रज अशा काही भागांमधील हवेची गुणवत्ता बिघडली होती. हवेची गुणवत्ता बिघडल्याने श्वसनास त्रास होणे, दम लागणे अशा आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

# ससून'च्या अधिष्ठातापदी पुन्हा डॉ. काळे!

## रसायनांमुळे सागरी आणि मानवी आरोग्य धोक्यात



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदावरून डॉ. संजीव ठाकूर यांना राज्य सरकारने शुक्रवारी (ता.१०) पदमुक्त केले होते. त्याच दिवशी उच्च न्यायालयानेही डॉ. ठाकूर यांची नियुक्ती रद्द करून आधीचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्या पुनर्नियुक्तीचे आदेश दिले होते. त्यामुळे डॉ. काळे यांनी तातडीने अधिष्ठातापदाचा कार्यभार स्वीकारला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. काळे यांच्या नियुक्तीचा आदेश अद्याप वैद्यकीय शिक्षण विभागाने काढलेला नाही. ससूनच्या अधिष्ठातापदावरून त्यांची बदली करण्याचा आधीचा आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केला होता. त्याचदिवशी अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ठाकूर दोषी आढळले. राज्य सरकारने डॉ. ठाकूर यांना पदमुक्त केले तर अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते यांना निलंबित केले. त्यामुळे अधिष्ठातापद रिक्त झाल्याने डॉ. काळे यांनी तातडीने शनिवारी (ता.११) या पदाचा कार्यभार स्वीकारला. ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती नेमली होती.

या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय

> “ होते. माझ्या नियुक्तीचा उच्च न्यायालयाचा आदेश असल्याने मी अधिष्ठातापदाचा कार्यभार स्वीकारला आहे. राज्य सरकारकडून याबाबतचा आदेश सोमवारी (ता.१२) निघणे अपेक्षित आहे.
> — डॉ. विनायक काळे, अधिष्ठाता, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून रुग्णालय

शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. या समितीने ललित पाटील प्रकरणात डॉ. ठाकूर यांच्यासह इतर अधिकाऱ्यांना दोषी धरले आहे. त्यामुळे राज्य सरकारने प्राथमिक कारवाई करून खात्यांतर्गत चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणी इतरही अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. काळे यांच्या नियुक्तीचा आदेश अद्याप वैद्यकीय शिक्षण विभागाने काढलेला नाही. ससूनच्या अधिष्ठातापदावरून त्यांची बदली करण्याचा आधीचा आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केला होता. त्याचदिवशी अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ठाकूर दोषी आढळले.